संदर्भ -

1. श्री नुरमहंमद अब्दुकरीम इनामदार ( मुलाणी ) रा मालगांव रोड सुभाषनगर ता. मिरज जि. सांगली यांचा अर्ज
2. सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ना.ज.क.धा. सांगली यांचेकडील क्र युएलसी/कावि/142/2014 दि. 4.10.2014
3. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.सांगली यांचेकडील जा क्र आरोग्य / जागा तपासणी/675/14 दि. 3.09.2014
4. कार्यकारी अभियंता विदयुत वितरण कंपनी सांगली EE/SGLR/T/JET/No5986 Dt 7.11.2014
5. सां.बां विभाग मिरज यांचेकडील जा.क्र. रेशा/2/नाही/7801/ सन 200 दि. 19.09.2014
6. पाटबंधारे विभागाकडील जा.क्र. सापामं/प्रशा-1/55/2015 दि. 5.01.2016
7. सहा. संचालक नगररचना सांगली यांचेकडील जा.क्र. रेखांकन/ मौजे मालगांव/ता. मिरज/ससंसा/505 दि. 30.04.2015
8. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 44,

---

जिल्हाधिकारी, सांगली
सत्यमेव जयते
जिल्हा - सांगली

क्र मह-2 /बिनशेती/ आदेश / एस आर - 99/15
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
दिनांक - 9 /03/ 2016

विषय - बिनशेती परवानगीबाबत
मौजे मालगांव येथील ग.नं. 2083 क्षेत्र 6050.00 क्षेत्रास
औदयोगिक कारणासाठी बिनशेती परवानगी देणेबाबत

श्री नुरमहंमद अब्दुकरीम इनामदार ( मुलाणी ) रा मालगांव रोड सुभाषनगर ता. मिरज जि. सांगली यांनी मौजे मालगांव येथील ग.नं. 2083 पैकी क्षेत्र 6050.00 क्षेत्रास औदयौगिक कारणासाठी बिनशेती परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला आहे.

या कामी झाले चौकशीवरुन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 44 अन्वये मला असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी सांगली याव्दारे मौजे मालगांव ता. मिरज जि. सांगली येथील गट.नं. 2083 एकूण क्षेत्र 6050.00 क्षेत्रास खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे

| गावाचे नांव | ग.नं / स.नं | क्षेत्र | बिनशेती मंजूर क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| मालगांव | ग.नं. 2083 | 12100.00 चौ.मी. पैकी 6050.00 चौ.मी. | 6050.00 चौ.मी. |

बिनशेती वापर करण्यास अर्जदार श्री नुरमहंमद अब्दुकरीम इनामदार ( मुलाणी ) रा मालगांव रोड सुभाषनगर ता. मिरज जि. सांगली यांना सहा संचालक नगररचना सांगली यांचेकडील अटी व शर्ती व अर्जदार यांनी सादर केले प्रतिज्ञापत्रानुसार खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहून औदयौगीक कारणासाठी बिनशेती परवानगी देत आहे.

1) अर्जदारास ज्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्याची परवानगी दिलेली आहे त्यासाठीच जमिनीचा तिच्यावरील इमारतीसह वापर करील आणि जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय त्या जमिनीचा तिच्यावरील इमारतीसह वापर इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करणार नाही.
2) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व त्याखालील नियमांच्या तरतुदीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.
3) अर्जदाराला हा आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून एक वर्षाचे आत मंजूर केलेल्या रेखांकनानुसार
   a. संबंधित स्थानिक प्राइज़ व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटत असतील तसे रस्ते, नाले तयार करुन त्या जमिनीचा विकास करता येईल.
   b. सर्व्हेक्षण विभागाने भूखंडाचे मोजमाप आणि चिन्हांकन केल्यावर आणि असा जमिनीचा विकास केल्याशिवाय, त्यातील भुखंडाची कोणत्याही रितीने त्याला विल्हेवाट लावता येणार नाही.
4) अर्जदाराने भूखंडाची विक्री केले असेल किंवा अन्य रितीने विल्हेवाट लावली असेल तर या कार्यालयाचे आदेशात नमुद केलेल्या शर्तीच्या अधीन राहून त्या भूखंडाची विक्री किंवा अन्य रितीने विल्हेवाट लावणे व अर्जदाराने निष्पादन करावयाच्या विलेखात त्या संबंधी विशेष निर्देश करणे हे अर्जदाराचे कर्तव्य असेल.
5) वेळोवेळी कालावधीत वाढ करणेत आली नसेल तर अर्जदाराने एक वर्षाच्या कालावधीच्या आत जमिनीचा अकृषिक वापर ( एन.ए.वापर ) करण्यास सुरुवात करावी. तसे न केल्यास परवानगी रद्द करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.
6) जमिनीचा अकृषिक वापर करण्यास प्रारंभ केलेची तारीख अर्जदार तलाठयामार्फत तहसिलदार यांना एक महिन्याच्या आत कळविल, असे न केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता महाराष्ट्र जमीन महसूल ( जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी ) नियम 1969 च्या नियम 6 अन्वये कारवाई करण्यास पात्र असेल.
7) अर्जदार या आदेशाच्या तारखेपासून शासनाने विहित केलेल्या प्रति चौ.मी. ला 0.15.0 पै प्रमाणे अकृषिक आकारणी भरेल. जमिनीच्या वापरात कोणताही बदल केला असेल तर यापुढील आकारणी केलेंडर अकृषिक आकारणीच्या हमी कालावधी अजून समाप्त व्हावयाचा आहे हि वस्तुस्थिती विचारात न घेता वेगळया दराने अकृषिक आकारणी वसूल करण्यात येईल. सदरची अकारणी दि. 1.8.2001 चे प्रमाण दराप्रमाणे असून शासनाने वेळोवेळी मान्य केलेल्या अकृषिक आकारणी दराप्रमाणे आकारणी करणेत येईल.
8) प्रश्नाधिन जमिनीचे अकृषिक परवानगी कामी प्राप्त झाले विविध विभागाकडील / खात्याकडील नाहरकत दाखल्यामधील अटी / शर्ती अर्जदारांवर बंधनकारक राहतील.
9) या आदेशात नमुद केलेले क्षेत्र आणि अकृषिक आकारणी यामध्ये सर्वेक्षण विभागाला आढळून आलेल्या प्रत्यक्ष क्षेत्रानुसार फेरफार करता येईल.
10) अर्जदार यांनी अकृषिक आकारणी र.रु. 908/- ( नऊशे आठ फक्त ), रुपांतरीत कर र.रु. 4540/- (चार हजार पाचशे चाळीस फक्त) जि.प.उपकर र.रु. 6356.00 सहा हजार तीनशे छपन्न फक्त, ग्रा.प. उपकर 908/- ( नऊशे आठ फक्त) असे एकूण 12712/- (बारा हजार सातशे बारा फक्त) तलाठी मालगांव यांचेकडील पावती क्र 607425 दिनांक 9.02.2016 रोजी भरणा केला आहे.
11) अर्जदार यांनी मोजणी फी ( मोजमाप शुल्काचा भरणा ) रक्कम रु 2000/- ( अक्षरी रक्कम रुपये दोन हजार फक्त) मुख्यालय सहायक, उपअधिक्षक भुमि अभिलेख मिरज दि. 9.02.2016 रोजी यांचेकडे भरणा केला आहे.

Scanned with OKEN Scanner

12) अर्जदार जमिनीचा अकृषिक वापर करण्यास परवानगी मिळाल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीत त्या जमिनीवर कायम स्वरुपीचे इमारत बांधकाम करु शकेल. संदर्भाधिन जमिनीचे रेखांकनाला ( ले आऊट ) सहा संचालक नगररचना सांगली यांचेकडील जा.क्र. रेखांकन / मौजे मालगांव/ ता. मिरज/ ससंसा/505 दि. 30.04.2015 याच्या प्रतीक्षा निर्देशीत केलेल्या पत्रातील नमुद शर्तीच्या अधिन राहून तात्पुरती मंजूरी देण्यात येत आहे

a. भूखंडाचा केवळ औदयोगीक प्रयोजनासाठी वापर करण्यात येईल.

b. अर्जदारास भूखंडाची विल्हेवाट लावण्यापूर्वी ग्रामपंचायत यांना योग्य वाटेल अशा रितीने अंतर्गत रस्ते आणि त्याच्या लगतच्या नाल्याचे बांधकाम करावे लागेल आणि त्यास त्यांच्याकडे परिक्षणसाठी सुपूर्द करावे लागेल.

c. प्रत्यक्ष सिमांकन केलेल्या ठिकणच्या जागेवरील भूखंडाचे मोजमाप रेखांकन नमूद केलेंडर 100.00 चौ.मी. क्षेत्रापेक्ष कमी असणार नाही. तसेच 18.00 मि. अथवा त्यापेक्षा जास्त रुंदिच्या रस्त्यालगतचे भूखंड 450.00 चौ.मी क्षेत्रापेक्षा कमी असणार नाही.

d. कोणत्याही प्रकरणात भूखंडाचे पोटभाग ( तुकडे ) करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

e. प्रतिग्रहीताने ( अर्जदाराने ) अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करावे ते करताना त्याना जोडून असलेल्या जमिनीचे रेखाकन जर यापूर्वीच मंजूर केलेले असेल आणि त्याठिकाणी चिन्हांकन केलेले असेल तर त्यासारख्याच रस्त्याने ते एकमेकांना जोडावीत.

f. लगतच्या जमीनीचे रेखांकन जेव्हा तयार करण्यात येईल तेव्हां उपरोक्त रेखांकन ( ले आऊट ) मधील रस्त्याच्या लगतच्या जमीन मालकाकडून प्रवेश म्हणून वापर करण्यात येईल.

g. अर्जदार सहा संचालक नगररचना सांगली कडून इमारत आराखरा मंजूर करुन घेईल.

h. बांधकाम सुरु करण्यापूर्वी उपअधिक्षक, भूमिअभिलेख मिरज यांचेकडून रेखांकनाचे मोजमाप करुन घेणेत येईल आणि मोजणी नकाशाप्रमाणे रेखांकन करुन सुधारीत रेखांकनास अंतिम मंजूरी घेणेस अर्जदारास बंधनकारक राहिल.

i. नागरी जमीन कमाल कायदा अधिनियम 1976 च्या तरतुदीच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे.

j. अर्जदार यांनी खुल्या जागेत दर 100 चौ.मी. अंतरावर 10 झाडे लावून त्यांचे संगोपन करणे बंधनकारक राहील.

13) अर्जदाराला महाराष्ट्र जमीन महसूल ( जमिनीच्या वापरात बदल आणि अकृषिक आकारणी ) नियम 1969 ला जोडलेल्या अनुसूची 4/5 मध्ये असलेल्या नमुन्यामध्ये जमिनीच्या अकृषिक वापरास प्रारंभ करण्याच्या संबंधातील सर्व शर्ती सनदेमध्ये सहनिर्दैष्ठ करुन देणे बंधनकारक असेल.

अ प्रतिग्रहितांने ( अर्जदाराने ) या आदेशामध्ये आणि सनदेमध्ये नमुद केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास संहितेच्या तरतुदी अन्वये ज्या शर्तीस तो पात्र असेल अशा इतर कोणत्याही शास्तीला बाधा न आणता जिल्हाधिकारी निर्देश देतील असा दंडाच्या आणि आकारणीच्या रक्कमेचा भरणा केल्यावर जिल्हाधिकारी सांगली उक्त जमीन अर्जदाराच्या ताब्यात असल्याचे चालू ठेवील.

ब उक्त खंड (अ) मध्ये काही नमुद केलेले असले तरी जिल्हाधिकारीयांचेकडून त्या संबधात विनिर्दिष्ट करण्यात येईल असा वेळेत या मंजूरीच्या तरतुदीचे उल्लघंन करुन उभारलेली किंवा वापरणेत येणारी कोणतीही इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचा किंवा फेरबदल करण्याचा निर्देश देणे हे जिल्हाधिकारी सांगली यांना कायदेशीर ठरेल व काढून टाकलेल्या किंवा फेरबदल केलेल्या बांधकामाचे विट मातीचे तुकडे विनिर्दिष्ट वेळेत हटविले नाही तर ते त्याला हटविण्यास भाग पाडता येईल आणि बांधकाम हटविण्याचा खर्च अर्जदारांकडून जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल. परवानगी देणे हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायदयाच्या तरतुदीच्या अधीन आहे. आणि ती प्रकरणाशी संबंधित इतर अधिनियमाना म्हणजेच उदा. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, नगरपालिका अधिनियम, कुळवहिवाट व शेत जमिनी अधिनियम 1948 इ. लागू असेल.

14) अर्जदाराने पुरविलेली कोणतीही माहिती / कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असे आढळून आलेस सदरचा बिनशेती आदेश आपोआप रद्द समजणेत येईल.

जिल्हाधिकारी, सांगली
सत्यमेव जयते
जिल्हा - सांगली

जिल्हाधिकारी सांगली

प्रति, श्री नुरमहंमद अब्दुलकरीम इनामदार ( मुलाणी )
रा मालगांव ता. मिरज जि. सांगली

प्रत

1. तहसिलदार मिरज यांना

2/- तालुका नमुना नं दोन / पाच आणि गा.न.नं 2 मध्ये आवश्यक नोंदी घेण्यासाठी आणि आदेश सालतील उपकराची रक्कम व दरसाल वार्षिक अकृषिक आकार उपकरासह अर्जदाराकडून वार्षिक आकारणी वसूल करणेसाठी आणि नोंद घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी भोगवटाधारकाने मोजमाप शुल्क भरणा केला आहे. त्यांने उपअधिक्षक भूमि अभिलेख तदनंतर मंजूर केलेले रेखांकन ( ले आऊट ) आणि प्रस्तूत जमिनीच्या संबंधातील अधिकार अभिलेखातील उतारे यासह कळवावे.

2. सहा संचालक नगररचना सांगली यांना माहितीसाठी
3. सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ना.ज.क.धा. सांगली यांना माहितीसाठी
4. उपविभागीय अधिकारी मिरज यांना माहितीसाठी
5. मडळ अधिकारी सांगली यांना माहितीसाठी
6. उपअधिक्षक भुमि अभिलेख मिरज यांना माहितीसाठी रवाना
7. अंतर्गत लेखा परिक्षा पथक, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांना माहितीसाठी रवाना
8. सहायक संचालक नगररचना मुल्यांकन पुणे 5 फायनान्स रोड, फोटो इमारत पहिला मजला पुणे - 411001 यांना माहितीसाठी.

TRUE COPY
SAROJ SANJAY JADHAV
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
AHIRE COLONY
M I D.C. SATARA - 415 004
MOB.: 9370317390

NOTARY GOVERNMENT OF INDIA

जिल्हाधिकारी सांगली

Scanned with OKEN Scanner